**महाराष्ट्र शासन**

मरालॉ २०२३/प्र.क.१०२/लॉटरी-३

महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालय,
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादामा कामा रोड, हुतात्मा राजगुरु
चौक,मंत्रालयासमोर, मुंबई-३२
दिनांक: १२/०३/२०२५.

प्रति,

संचालक,
माहिती तंत्रज्ञान संचालनालय,
मंत्रालय, मुंबई-३२.

विषय: लॉटरी संचालनालयाच्या अधिनस्त उपसंचालक (वि. व ले.) यांच्या कार्यालयाकरिता नवीन कार्यालयीन जागा उपलब्ध करून घेण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भातील ई-निविदा सूचना महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

रोहित सोनवणे
12.3.2025

( रोहित सोनवणे )
राज्य लॉटरी अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
वित्त विभाग.

## महाराष्ट्र शासन

मरालॉ २०२३/प्र.क.१०२/लॉटरी-३

महाराष्ट्र राज्य लॉटरी संचालनालय,
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादामा कामा रोड, हुतात्मा राजगुरु
चौक, मंत्रालयासमोर, मुंबई-३२.
दिनांक : १२/०३/२०२५.

## ई-निविदा सूचना

विषय:- लॉटरी संचालनालयाच्या अधिनस्त उपसंचालक (वि. व ले.) यांच्या कार्यालयाकरिता नवीन कार्यालयीन जागा उपलब्ध करून घेण्याबाबत.

लॉटरी संचालनालयाच्या अधिनस्त उपसंचालक (वि. व ले.) यांच्या कार्यालयाकरिता नवीन कार्यालयीन जागा उपलब्ध करून घेण्याकरिता आवश्यक पात्रता निकष, प्राधान्य निकष व सर्वसाधारण अटी व शर्ती पुढील प्रमाणे आहेत: -

अ) <u>पात्रता निकष -</u>

१) कार्यालयीन जागा दि. ०१/०५/२०२५ पासून वापरात हवी असल्याने, तात्काळ वापरास येऊ शकणारी (Ready to move) आणि १ मे पूर्वी ताबा घेता येण्यासारखी असावी.
२) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मानांकानुसार किमान ६००० ते ८५०० चौ. फूट क्षेत्रफळाची जागा आवश्यक आहे.
३) सदर जागा मुंबई वा नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील असावी.
४) कार्यालयाच्या आवश्यकतेप्रमाणे बैठक व गोडाऊन व्यवस्था तयार असावी अथवा जागेचा मालक आवश्यकतेप्रमाणे सदर व्यवस्था करून देण्यास तयार असावा.
५) सदर जागेत विद्युत व वातानुकूलन यंत्रणेची व्यवस्था असावी.
६) सदर जागेत पुरुष व स्त्रिया यांचेकरिता स्वतंत्र सुस्थितीतील स्वच्छतागृहे असावीत.
७) सदर जागेचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वाजवी भाडे मर्यादेच्या आत असावे तसेच हे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी जागा मालकाची असेल.

**ब) <u>प्राधान्य निकष -</u>**

१) सदर जागा व परिसर सुरक्षित असावा. तसेच संबंधित इमारतीत सुरक्षा-रक्षक असावा. बांधकामाच्या भिंती व छत सिमेंटचे भक्कम असावे.

२) कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या दुचाकी व चार चाकी वाहनांकरिता किमान दहा चारचाकी वाहनांची पार्किंगची व्यवस्था उपलब्ध असावी.

३) ज्या भागात अवजड वाहने जाणे-येणेस निर्बंध नाही, अशा ठिकाणी जागा असावी. सबब जागा मुख्य किंवा जोड रस्त्यास लागून असावी व जागेपर्यंत पोहोचण्याकरिता अवजड वाहनांच्या वेळेचे निर्बंध लागू नसावेत.

४) सदर जागेच्या परिसरात तिकिटाच्या गोणी उचलण्यासाठी रोजंदारीचे हमाल उपलब्ध असावेत.

५) भाडेकरू नसलेल्या रिकाम्या जागेस प्राधान्य देण्यात येईल.

क) <u>सर्वसाधारण अटी व शर्ती-</u>

१) एका पुरवठादारास एकच निविदा सादर करता येईल.

२) निविदादारांकडून त्यांची दरपत्रके दिनांक ३१/०३/२०२५ सायं ६.०० वाजेपर्यंत माहोरबंद लिफाफ्यात "आयुक्त, राज्य लॉटरी" यांचे नावे पाठविण्यात यावीत. त्यानंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

३) मोहोरबंद लिफाफ्यावर "कार्यालयीन जागेकरिता दरपत्रक" असे लिहिणे आवश्यक आहे.

४) दरपत्रक फॉर्म्सवर, दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक राहील.

५) प्राप्त दरपत्रक दिनांक ०४/०४/२०२५ रोजी आयुक्त, राज्य लॉटरी, लॉटरी संचालनालय, वित्त विभाग, ८ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-३२, येथे दुपारी ०३.३० वाजता उघडण्यात येतील.

६) दरपत्रकांचे मोहोरबंद लिफाफे उघडते वेळी दरपत्रकधारक स्वत: किंवा त्याचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

७) निविदा स्वीकृत होऊन आदेश निर्गमित केल्यानंतर व करार केल्यानंतर आयुक्त, राज्य लॉटरी यांना तात्काळ व स्वीकृत दरपत्रकानुसार जागा ताब्यात देणे पुरवठादारकावर बंधनकारक राहील.

८) जागा ताब्यात दिल्यानंतर दरमहा मुद्रांक पावतीसहित देयके सादर करावीत. देयकाची रक्कम ECS द्वारे जमा करण्यासाठी बँक खात्याचा सविस्तर तपशील सादर करणे आवश्यक राहील. परिपूर्ण देयके सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील. तसेच, प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

९) कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा, निविदा प्रकिया पूर्णपणे किंवा दरपत्रक स्वीकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा

तसेच दिलेले कार्यादेश रद्द करण्याचा अधिकार आयुक्त, राज्य लॉटरी शासन राखून ठेवत आहे.

१०) पुरवठादार संस्था नोंदणीकृत (उद्योग आधारधारक किंवा उद्योग नोंदणी प्रमाणपत्र धारक) असावा.

११) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१८/प्र.क्र.४७/विमा प्रशासन दि.१३/०७/२०२२ नुसार सदर जागेचा विमा संबंधित पुरवठादार यांनी उतरविणे बंधनकारक राहील.

१२) उपरोक्त अटी व शर्ती व्यतिरिक्त अन्य आवश्यक अटी शर्ती, करार करतेवेळी अंतर्भूत करण्याचा अधिकार विभागाकडे असेल.

१३) उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे निविदा दरपत्रक मध्ये नमूद असेल, तरच निविदादारकाच्या दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

ठिकाण:- मुंबई.

रोहित सोनवणे
१२.३.२०२४

(रोहित सोनवणे)
कक्ष अधिकारी तथा राज्य लॉटरी अधिकारी
वित्त विभाग.